# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २०/१२/२०१८

## सभा सुचना क्रं. १५

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.०७/१२/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- दि. ०७/१२/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल सांळुख्रे सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | प्रभाग समिती एफ , धानिव /पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.७२ मधील भोईर नगर येथे गावराई पाडा मुख्य रस्ता ते नाला पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. ७३,२१,१५२/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या ७३,२१,१५१/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील खैरपाडा येथील स्मशानभुमी विकसीत करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. ७२,६१,०१८/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उसगाव/शिरवली २० द.ल.ली पाणी पुरवठा योजना अंतर्गत पारोळ जलशुध्दीकरण केंद्र येथे संरक्षक भिंत बांधणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमुद कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांस व पुढील निविदा कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल सांळुख्रे सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र. २६ मनवेलपाडा मधील विजयानंद पार्क बिल्डिंग ते गणेश नगर पर्यंत रस्ता खडीकरण करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमुद कामाच्या रू. ७४,८४,९४२/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करणेस मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील जाधवपाडा येथील रामधनी नगर ते नाल्यापर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी पाईप गटार बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराच्या निविदाधारका सोबत संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे.समिर कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | विरार (पू) प्रभाग क्र.२१ मध्ये गोकूळधाम जवळ नाला बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सन २०१८-१९ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका विरार पूर्व प्रभाग क्र. २१ मध्ये गोकुळधाम जवळ नाला बांधणे कामी २३,८१,६३३/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रकीय होणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री वैभव पाटील सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | विरार (पू.) प्रभाग क्र.१ मध्ये बरफपाडा बर्फेश्वर तलाव ते चंदनसार मुख्य रस्त्यापर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा विषय क्र. ११२ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिकेचे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे. तरी मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकेचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ९. | प्रभाग समिती जुना ड नवीन जी मधील वॉर्ड क्र.जुना ६३ नवीन ९० मधील कोल्ही पाळणापाडा आर.एम.सी प्लॉन्ट ते किसन घाटाळ येथे घरापर्यंत पाईप गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक पाथवे बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. अंजनी कन्स्ट्रक्शन यांची निविदा १६.४२% कमी दराने दर सर्वात कमी व वाजवी आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे. मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करण्यास तसेच येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | प्रभाग समिती जुना ड नवीन जी मधील वॉर्ड क्र. जुना ६३ नविन (९०) मधील कोल्ही | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. सुरेश एंटरप्रायजेस यांची निविदा १३.३७% कमी दराने दर सर्वात कमी व वाजवी आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता |

| | | |
|---|---|---|
| | पाळणापाडा येथे विश्वनाथ झिरवे ते यादव चाळ व प्रदीप भुरकुन चाळ पर्यंत पाईप गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक पाथवे बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे. मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करण्यास तसेच येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ११. | प्रभाग समिती जुना ड नवीन जी मधील वॉर्ड क्र. जुना ६३ नविन (९०) मधील कोल्ही गांजाडीपाडा येथे तलाव ते पारसनथ यादव पर्यंत पाईपड्रेन बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. सुरेश एंटरप्रायजेस यांची निविदा १३.११% कमी दराने दर सर्वात कमी व वाजवी आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे. मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करण्यास तसेच येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | सुर्या टप्पा -३ योजनेतून वाढीव पाणी उपलब्ध झाल्याने शहरातील उंच साठवण टाकी विद्युत पंपाच्या सहाय्याने न भरता थेट गुरुत्वदाबाने भरणेस्तव आवश्यक त्या ठिकाणची जलवाहिनी बदलणे कामीच्या लघुत्तम निविदाधारकासोबत संविदा करणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदेची तुलना करता कमीत कमी दराची मे. संदेश बुटाला यांची ८.७३% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. संदेश बुटाला यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | प्रभाग समिती - एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४४ मधील वालईपाडा गरेल कंपाऊंड येथे तिरुपती बालाजी नगर ते जोया हॉस्पीटल पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषय संविदा करण्यासाठी मा.स्थायी समितीपुढे दि. ०९.०७.२०१८ रोजी ठेवण्यांत आला होता. परंतु एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या ठेकेदाराने परफॉर्मन्स सिक्युरेटीचा डि.डी. स्कॅन करून अपलोड केला नसल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीने स्थगीत ठेवला होता. परंतु सदर विषयाबाबत सभागृहात पुनश्चः साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामे मे. एस.एम.डेव्हलपर्स यांची निविदा ८.५१% कमी ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील कार्यरत असलेल्या आर.सी.एच -फेज-२ उपक्रमांतर्गत विविध पदावरील कर्मचाऱ्यांना शासनाच्या अध्यादेशा | ठराव :- महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील आर.सी.एच-फेज-२ उपक्रमाअंर्गत कार्यरत असलेले जी.एन.एम - ३., ए.एन.एम.-१२, अकाऊंटंट-१, डाटा एन्ट्री ऑपरेटर-१, कनिष्ठ लिपिक तथा संगणक चालक -४ व शिपाई -३ असे एकूण २४ कर्मचाऱ्यांचे माहे जूलै २०१७ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीतील महागाई भत्ता फरकाची रक्कम रु. १,८३,३९६/- अदा करणेस तसेच वेळोवेळी शासनाच्या अध्यादेशानुसार महागाई भत्ता वाढ झाल्यास सदर कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्यापोटी मिळणारे वेतन अदा |

| | | |
|---|---|---|
| | नुसार वाढलेला महागाई भत्तात वाढ करुन देण्याबाबत मा.वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभेने केलेल्या शिफारशी नुसार निर्णय होणेबाबत. | करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्रीम. विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती सी मधील कै.ॲड.सी.पी.सोलंकी परिक्रमा व नौकविहार केंद्र उद्यान (टोटाळे तलाव) व साने गुरुजी बालोद्यान देखभाल करणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती सी मधील कै.ॲड.सी.पी.सोलंकी परिक्रमा व नौकविहार केंद्र उद्यान (टोटाळे तलाव) व साने गुरुजी बालोद्यान या उद्यानांचे मंजूर दरानुसार दि. ३१/०३/२०२१ पर्यत देखभाल करणेसाठी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६ | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई मधील चक्रेश्वर तलाव देखभाल करणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकास प्रभाग समिती ई मधील चक्रेश्वर तलाव उद्यानाचे मंजूर दरानुसार दि. ३१/०३/२०२१ पर्यंत देखभाल करणेसाठी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालय, तुळींज रुग्णालय येथे ४०००० ली.क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्र प्रकल्प उभारणे. | **ठराव** :- उपरोक्त निविदेची तुलना करता कमीत कमी दराची **मे.ग्लोबल ईनवायरोज** यांची १३.००% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे.ग्लोबल ईनवायरोज यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १८. | वसई विरार शहर महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापनाच्या अंतर्गत कचरा वाहतुकीच्या वाहनांना GPS यंत्रणा बसविणे कामी ई निविदा प्रक्रियेद्वारे मंजुर निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. याकामी मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार सर्वात कमी दराचे निविदाकार मे.रिलॅप टेक्नॉलॉजीस प्रा.लि.यांच्या सोबत संविदा करण्यास मा.स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १९. | महानगरपालिका सन्मा. पदाधिकारी व सदस्य यांच्यासाठी आयोजित केलेल्या इन्दौर येथिल अभ्यास दौऱ्यासाठी परिवहन सदस्यांना सहभागी करणेबाबत. | ठराव :- अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांच्या वतीने मध्यप्रदेशातील इंदीर या शहराचा अभ्यास दौरा वसई विरार शहर महानगरपालिकेचे पदाधिकारी, सदस्य व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. महानगरपालिकेत आपली परिवहन समिती अस्तित्वात असुन सदर समितीच्या माध्यमातुन शहरासह शहराबाहेरच्या नागरीकांना परिवहन सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे व सेवेला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळतो आहे. परिवहन सेवेत सुधारणा व्हाव्यात, प्रवाशांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात म्हणुन परिवहन समिती नेहमीच प्रयत्नशील आहे. इंदीर शहर हे ऐतिहासिक असे शहर आहे, स्वच्छ भारत अभियानात देखील शहराने नावलौकिक प्राप्त केलेला आहे. अर्थात तेथील पायाभुत सुविधा परिवहन प्रकल्प कसे कार्यरत आहेत याचा सर्व पालिका सदस्यांबरोबर परिवहन सदस्यांनाही अभ्यास करता येईल व पालिका सदस्य आणि परिवहन सदस्य याच्यात अभ्यास करून विचार विनीमयाच्या दृष्टीने एक चांगला समन्वय होईल म्हणुन इच्छुक परिवहन सदस्यांची नावे अनुक्रमे १) श्री.प्रितेश पाटील २) श्री.बाबुसिंह राजपुरोहित ३) श्री. अमित वैद्य ४) श्री. कुंदन विरारकर ५) श्री. कल्पक पाटील ६) श्री. हेमांग शहा ७) श्री. वसंत वरे अशी ही ७ परिवहन सदस्यांची नांवे इंदौर (मध्यप्रदेश) दौऱ्यासाठी समाविष्ट करणेस परिवहन समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळूंखे सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २०. | मा.सर्वसाधारण सभा दि. १९/०९/२०१८ ठराव क्र.--- अन्वये मंजूरी दिलेनुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-डोंगरे येथील स.नं-९८/१ व स.नं.-१०४/२ ब या जागेवरील "हायस्कुल आरक्षण क्र.२२१" व "प्रायमरी स्कुल आरक्षण क्र.२२२" या जागेवर मे.नॅशनल एज्युकेशन सोसायटीला हायस्कुल व प्रायमरी स्कुल बांधण्यास नाहरकत/परवानगी देणेकामी अटी-शर्ती मंजूर/कायम करणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे अटी-शर्ती मंजूर करणेंत येत आहेत. १) वसई-विरार शहर महानगरपालिकेने आवश्यक तेव्हा मागणी केल्यास शैक्षणिक इमारतीतील काही खोल्या वसई-विरार शहर महानगरालिकेला किंवा शासनाला उपलब्ध करून द्याव्यात २) मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार पुरेशी पार्किंगची सोय उपलब्ध करून देण्यांत यावी. ३) शासन निर्णय क्र. TPS-१८१५/१६४७/CR-१३/१५/UD-१३ दिनांक १४/०३/२०१६ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. ४) उपरोक्त अटीचे पालन होईल असे हमीपत्र संबंधित शैक्षणिक संस्थेने सादर करावे. ५) अनुज्ञेय चटई क्षेत्राव्यतिरीक्त मंजूर विकास नियंत्रण नियमावली नुसार अतिरीक्त बांधकाम क्षेत्र हे केवळ शैक्षणिक संस्थेसाठीच वापरावयाचे आहे. ६) शासन निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांना सवलत देऊन प्रवेश देणेत येणार आहे. त्याबाबतची माहिती प्रतिवर्षी स्थायी समितीकडे सादर करणेंत यावी. ७) शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदी नुसार आरक्षित २५% जागांपैकी ५% जागा या महापालिकेच्या मा.स्थायी समितीने शिफारस केलेल्या स्थानिक विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणेंत याव्यात. ८) महापालिकेने शाळेमध्ये प्रवेश देताना शाळेपासून ५ कि.मी. च्या हद्दीमधील विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देणेंत यावे. तरी वरील (१) ते (८) मधील नमूद अटी-शर्ती वर मे. नॅशनल एज्यूकेशन सोसायटीला हायस्कुल व प्रायमरी स्कुल बांधण्यास परवानगी देणेस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका